CHE/DP/3T
2014-15

**प्रारुप सुधारित विकास योजना बृहन्मुंबई.**
प्रारुप विकास योजना प्रसिध्द करण्यासाठी
महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६
चे **कलम-२६** अन्वये **मुदतवाढ** मंजूर करणेबाबत.

**नगर रचना संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य,**
**पुणे-४११ ००१.**
**दि. .१०.२०१४**

**निर्णय क्रमांक :-** प्रारुप विकास योजना बृहन्मुंबई (तिसरी सुधारित)/मुदतवाढ-कलम-२६/टिपीव्ही-३/ 5455
दि.२०.१०.२०१४.

**पहा** :- मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र दि.१९.०९.२०१४.

**निर्णय** :- सोबतची मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची अधिसूचना (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करावी.

(रा.म.पवार)
कार्यासन अधिकारी,
टिपीव्ही-३, पुणे

प्रत :-
१) मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, (नवि-११) मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सादर.
२) मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, बृहन्मुंबई.
३) मुख्य अभियंता, (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका, बृहन्मुंबई.
४) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.
५) व्यवस्थापक, शासकीय मध्यवती मुद्रणालय, नेताजी सुभाष पथ, मुंबई-४०० ००४.
/- त्यांना विनंती करण्यात येते कि, सोबत पाठविलेली अधिसूचना (इंग्रजी व मराठी) महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात, भाग एक कोकण विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी ५ प्रती या कार्यालयास आणि उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुख्य अभियंता (विकास नियोजन) बृहन्मुंबई महानगरपालिका यांना पाठवाव्यात.

बृहन्मुंबई महानगर पालिका
मुख अभियंता (विकास नियोजन)
यांचे कार्यालय
21 OCT 2014
E20484
क्र.प्र.अ./वि.नि./
साधारण | शहर | पूर्व. उप | प. उप

उप प्रमुख अभि (विनि)
21/10/14
प्रमुख अभियंता
(विकास नियोजन)

\TPV3\tpv3\TPV3\Kishor\Notification\Sec_26_G Mumbai.doc

22/10

4

AODP I/ HCDP Gen
22/10/14

**No. CHE/ 20484/DP/Gen. dtd. 21.11.2014**

Ch.E.(D.P.)

Dy.Ch.E.(D.P.)-I / II/Dy.Ch.E.(B.P.)(City)/E.S./W.S.-I/W.S.-II

E.E.(D.P.)City/E.E.D.P.(E.S.)/E.E.(D.P.)W.S.H&K/P&R/E.E.P.to Ch.E.(D.P.)

E.E.(B.P.)City I/II/III/E.E.B.P.(E.S.) I/II/ E.E.B.P.(W.S.) H&K (P&R_

A.E.(D.P.) ................................ / S.E. (D.P.) ....................................

Copy ~~forwarded~~ submitted for information & further necessary action please

21/11

**Administrative Officer**
**(Development Plan)**

20484

**TOWN PLANNING & VALUATION DEPARTMENT,**
**MAHARASHTRA STATE, PUNE.**
**ORDER**

**Maharashtra Regional & Town Planning Act,1966**
No.DP/Municipal Corporation of Greater Mumbai(III Rev)/Extn. U/S 26(1)/TPV–3/ 5455

Whereas, the Municipal Corporation of Greater Mumbai (hereinafter referred to as **"the said Municipal Corporation"**) by its Resolution No.767, dated 20.10.2008 made a declaration under Section 38 read with sub-section (1) of section 23 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as **"the said Act"**) of its intention to revise the sanctioned Development Plan of the Municipal Corporation of Greater Mumbai area and the notice of the said declaration was published in the Maharashtra Government Gazette, Part I supplement dated 1.7.2009;

And whereas, the said Act has been amended vide Maharashtra Act No.X of 2011, which came into effect from **05.04.2011** (hereinafter referred to as **"the said Amended Act"**); & further necessary order is issued vide order No.TPS-1812/CR-299/UD-13 dated 01/04/2013 in order to remove the difficulties in implementation of the said Amended Act;

And Whereas, in accordance with the provision of said amendment Act, the above declaration under Section 38 read with sub-section (1) of section 23 of said Act is considered to be made on 05.04.2011;

And Whereas, to further amend the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 Maharashtra ordinance No.XV of 2014 has promulgated vide publication in Government Gazzette dated 19.7.2014;

And whereas, as per latest censes record, population of the said Municipal Corporation is above one crore and in accordance with the provision of sub-section (1) of Section 26 of the said Act, and in accordance with the said ordinance the said Municipal Corporation has to prepare the revised Development Plan (hereinafter referred to as **"the said Plan"**) and publish a notice of such preparation in the Official Gazette and in other prescribed manner not later than two years from the date of notice published under Section 23 or within such further period as may be extended by the State Government, but such extended period not to exceed more than **Twenty Four months in aggregate**;

And whereas, the said Municipal Corporation by letter No.MCP/9747, dt.19.09.2014 has requested the Director of Town Planning, Maharashtra State, Pune to extend the period for publishing a notice of such preparation in the Official Gazette and in other prescribed manner upto and inclusive of 03.04.2015 under the provision of sub-section-(1) of section-26 of the said Act;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune has earlier extended the period for the publication of the notice of such preparation of the plan in the Official Gazette and in other prescribed manner for a period **upto and inclusive of 04.10.2014** vide his order dated 07.08.2014;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that it is expedient to extend the period for the publication of the notice of such preparation of the plan in the Official Gazette and in other prescribed manner for a further period as requested by the said Corporation **from 05.10.2014 upto and inclusive of 03.04.2015;**

Now, therefore, in exercise of powers delegated to him under Government Notification, Urban Development & Public Health Department, No.TPS-3177/1989/UD-6, dated 10th December, 1979, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune hereby extends the period for preparation of the said Plan and publication of the Notice of such preparation in the Official Gazette and in other prescribed manner upto and **inclusive of 03.04.2015** under the provision of sub section (1) of **Section 26** of the said Act.

( K.S.Akode )
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**
**आदेश**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना, अधिनियम १९६६**

क्र.प्रा.वि.यो.बृहन्मुंबई(तिसरी सु.)/मुदतवाढ-कलम २६/टीपीव्ही-३/ ५४५५, दि. २० .१०.२०१४

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७ वा) (यापुढे **उक्त अधिनियम** असे निर्देशिलेले) च्या कलम २३(१) आणि ३८ मधील तरतुदीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने (यापुढे **उक्त महानगरपालिका** असे निर्देशिलेली) सुधारित विकास योजना तयार करण्याचा इरादा ठराव क्र. ७६७, दि.२०.१०.२००८ अन्वये जाहीर करुन त्याबद्दलची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात पुरवणी भाग-१, मध्ये दि.१.७.२००९ रोजी प्रसिध्द केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियम सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१० नुसार सुधारित झालेला असून तो **दि.५.४.२०११** पासून अंमलात आला आहे, (यापुढे **उक्त सुधारणा अधिनियम** असे निर्देशिलेला) आणि तद्नंतर उक्त सुधारित अधिनियमाच्या अंमलबजावणीमधील अडचणी दुर करण्यासाठी शासनाने आदेश क्र.टिपीएस-१८१२/प्र.क्र.२९९/१३/नवि-१३, दि.१.४.२०१३ अन्वये उक्त सुधारित अधिनियमान्वये आदेश निर्गमित केले आहेत.

आणि ज्याअर्थी, सुधारणा अधिनियमातील तरतूदीनुसार वैधानीक कार्यवाही करणे आवश्यक असल्याने उक्त विकास योजना प्रकरणी उक्त दि.०५.०४.२०११ ही मानीव तारीख इरादा जाहीर झाल्याची समजणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना, अधिनियम १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१५ शासन राजपत्र प्रसिध्दी दि.१९.७.२०१४ अन्वये प्रख्यापित झाला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेची अलिकडच्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार लोकसंख्या एक कोटी किंवा त्यापेक्षा अधिक आहे. तसेच उक्त सुधारणा अधिनियम व उक्त अध्यादेश यानुसार कलम २३ अन्वये राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या सूचनेच्या तारखेपासून दोन वर्षांच्या आत अगर शासनाने वाढवून दिलेल्या पुढील २४ महिन्यापर्यंतच्या मुदतीच्या आत उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) नुसार उक्त महानगरपालिकेने प्रारुप सुधारित विकास योजना (यापुढे **उक्त विकास योजना** असे निर्देशिलेली) तयार करुन त्याबद्दलची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये आणि इतर विहित मार्गाने प्रसिद्ध करणे जरुरीचे आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महानगरपालिकेने त्यांचेकडील पत्र जा.क्र.MCP/९७४७, दि.१९.०९.२०१४ अन्वये अधिनियमाच्या कलम २६(१) च्या तरतुदीनुसार उक्त विकास योजना तयार करुन त्यासंबंधातील अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये आणि अन्य विहित मार्गांनी प्रसिद्ध करण्याकरिता, ही सर्व कार्यवाही विधीग्राह्य मुळ मुदतीपुर्वी होणे शक्य नसल्याने ती पूर्ण करण्यास दि.०३.०४.२०१५ पर्यत मुदतवाढ मंजूर होणेबाबत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे याना मुदतवाढीचा प्रस्ताव सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजना तयार करुन त्याबद्दलची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये आणि अन्य विहित मार्गांनी प्रसिद्ध करण्याकरिता लागणारा कालावधी **दि.०४.१०.२०१४** हा दिवस धरुन त्या दिवसापर्यंत वाढविणेबाबत यापुर्वी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.०७.०८.२०१४ रोजीच्या आदेशान्वये मुदतवाढ मंजूर केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजना तयार करुन त्याबद्दलची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये आणि अन्य विहित मार्गांनी प्रसिद्ध करण्याकरिता लागणारा कालावधी महानगरपालिकेच्या

विनंतीप्रमाणे **दि.०५.१०.२०१४ ते दि.०३. ०४.२०१५** हा दिवस धरुन त्या दिवसापर्यंत वाढविणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना वाटते;

त्याअर्थी, शासकीय अधिसूचना, नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.टीपीएस-३१७७/१९८९/यूडी-६, दि.१० डिसेंबर, १९७९ अन्वये प्रदत्त केलेल्या शक्तींचा वापर करुन संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे उक्त अधिनियमाच्या **कलम-२६(१)** नुसार उक्त विकास योजना तयार करुन त्याबद्दलची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये आणि अन्य विहित मार्गांनी प्रसिद्ध करण्याचा कालावधी **दि.०३. ०४.२०१५** हा दिवस धरुन त्या दिवसापर्यंत वाढवीत आहेत.

(क.स.आकोडे)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.